# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**संग्रामपूर (जि.बुलढाणा) पंचायत समितीच्या गोडावूनमध्ये अनुसूचित जाती, जमाती आदिवासींसाठी वाटप करण्यात आलेले साहित्य वापराविना पडून असल्याबाबत**

**(१) १९७५८ (१४-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर (जि.बुलढाणा) पंचायत समितीच्या गोडावूनमध्ये अनुसूचित जाती, जमाती, आदिवासीसाठी १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यासाठी आलेले लाखो रुपये किंमतीचे साहित्य गेल्या ७ ते ८ वर्षापासून वापराविना पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) नाही.

जिल्हा परिषद सेसफंडातून समाजकल्याण योजनेअंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना वाटपाकरिता प्राप्त साहित्य वेळोवेळी पंचायत समिती, संग्रामपुर कार्यालयास प्राप्त आदेशानुसार, सर्व कागदपत्राची पूर्तता करून पात्र लाभार्थ्यांना साहित्य पंचायत समिती, संग्रामपूर यांच्याकडून वितरीत करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा परिषदेत उर्दू शिक्षकाच्या नियमबाह्य भरतीबाबत**

**(२) २३११० (१४-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेत नियमबाह्य उर्दू शिक्षकाच्या भरती प्रकरणाची चौकशी थांबवण्याचा प्रयत्न मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यावर व संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भरती काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने जिल्हा परिषदेमध्ये करण्यात आलेली आहे व याबाबत माहे जुलै २०१४ मध्ये वा त्यादरम्यान स्थायी समितीच्या सभेत सदस्यांनी चौकशी करण्याचे मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी ९० टक्के पूर्ण झाली असताना अचानक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत आंतरजिल्हा बदली मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत मा.श्री.संजय धोत्रे, लोकसभा सदस्य अकोला यांचे दिनांक १०-६-२०१५ व श्री.रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य, अकोला (पूर्व) यांचे दिनांक २०-७-२०१५ चे पत्र तसेच श्री.गोवर्धन शर्मा, आमदार अकोला (पश्चिम) यांचे दिनांक १०-६-२०१५ चे पत्रान्वये तक्रारी दाखल केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने तत्कालीन उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली होती. या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरूध्द कारवाई करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना दि. २-६-२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मेडकी ग्रामपंचायतीकडून डि.व्हि.डी.एफ योजनेमधून बँकेसाठी इमारत बांधकाम करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याबाबत**

**(३) २३४१५ (१७-०८-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी तालुक्यातील मेडकी ग्रामपंचायतीकडून डि.व्हि.डी.एफ योजनेमधून बँकेसाठी इमारत बांधकाम करण्यासाठीचा ५८ लक्ष रुपयांचा प्रस्ताव जिल्हा परिषद पंचायत विभाग, चंद्रपूर यांच्याकडे अंतिम मंजूरीसाठी पाठविण्यात आले असताना सुध्दा गेल्या वर्ष भरापासून अद्यापही मंजूरी मिळालेली नसल्याची माहिती माहे दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) व (२) ग्रामपंचायत मेंडकी यांचा जिल्हा ग्रामविकास निधी मधून कर्ज मिळणेबाबतचा प्रस्ताव गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ब्रम्हपुरी यांचेकडून दिनांक ०५/०२/२०१५ रोजी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे सादर करण्यात आला. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३३ व मुंबई जिल्हा (ग्राम विकास निधीबाबत) नियम, १९६० चे नियम ११ नुसार स्थायी समितीस कर्ज देण्याचा अधिकार असल्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने स्थायी समितीच्या दिनांक १८.०३.२०१५ च्या सभेत विषय ठेवण्यासाठी परवानगीकरिता नस्ती सचिवांमार्फत मा.अध्यक्ष, जि.प.चंद्रपूर यांचेकडे सादर करण्यात आली असता, दिनांक १५.०६.२०१५ ला त्रुटी दर्शवून नस्ती परत करण्यात आली असल्यामुळे, त्रुटींची पूर्तता करून दिनांक १९/०६/२०१५ च्या स्थायी समितीमध्ये ठेवण्यासाठी सदरील प्रस्ताव फेरसादर करण्यात आला होता. तथापि, ग्रामपंचायत मेंडकी यांनी दिनांक ११.०८.२०१५ चे पत्रान्वये प्रस्ताव परत मागितलेला असल्यामुळे मा.अध्यक्ष, जि.प.चंद्रपूर यांचेकडून दिनांक ०९.०९.२०१५ ला प्रस्तावासह नस्ती परत करण्यात आली आहे.

सबब, ग्रामपंचायत मेंडकी यांचा जिल्हा ग्रामविकास निधी योजनेमधून कर्ज मिळणेबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात बनावट आंतरजिल्हा बदल्याद्वारे तब्बल १७५ शिक्षक रुजू झाल्याबाबत

**(४) २६१७१ (१७-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात बनावट आंतरजिल्हा बदल्याद्वारे तब्बल १७५ शिक्षक रुजू झाल्याचे चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश बदल्यांनी नोंद शिक्षण विभागाकडे नसुन अनेक बदल्यांसाठी दलालांनी बनावट आदेश तयार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीने सदर प्रकरणाचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) अकोला जिल्हा परिषदेमध्ये अतिरिक्त पदे कार्यरत असताना, जागा रिक्त नसताना व २००७ पासून बिंदु नामावली अद्ययावत नसताना १७७ आंतरजिल्हा बदली प्रकरणास मान्यता देण्यात आली आहे. तथापि अकोला जिल्हयातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या जुन्या तारखेचे बनावट आदेश तयार करून बदल्या झालेल्या नाहीत.

(३), (४) व (५) जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत आंतरजिल्हा बदली मध्ये झालेल्या अनियमिततेबाबत मा.श्री.संजय धोत्रे, लोकसभा सदस्य अकोला यांचे दिनांक १०-६-२०१५ व श्री.रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य, अकोला (पूर्व) यांचे दिनांक २०-७-२०१५ चे पत्र तसेच श्री. गोवर्धन शर्मा, आमदार अकोला (पश्चिम) यांचे दिनांक १०-६-२०१५ चे पत्रान्वये तक्रारी दाखल केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने तत्कालीन उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरूध्द कारवाई करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना दि.२-६-२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## नादरपूर ते निधोना (जि.औरंगाबाद) रस्त्यांची दुरुस्ती व नादरपूर ते पिंपरखेडा नदीवर पूल बांधण्याबाबत

**(५) २६४७६ (०४-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नादरपूर ते निधोना (जि.औरंगाबाद) रस्त्यांची दुरुस्ती व नादरपूर ते पिंपरखेडा नदीवर पूल बांधण्याची मागणी स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे सदरच्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असून तेथे वारंवार छोटे-मोठे अपघात होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरिता व पिंपरखेडा नदीवर पूल बांधण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) विषयांकित रस्ता इतर जिल्हा मार्ग असून जिल्हा वार्षिक योजनेमधून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ५.०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले असून १.०० कि.मी. लांबीचे काम प्रगतीत आहे.

सदर रस्ता यापूर्वी इजिमा-११० दर्जाचा होता. आता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.९.६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये रस्ता दर्जोन्नत करण्यास मंजुरी देण्यात आली असून सदर रस्ता हस्तांतरणाची कार्यावाही जिल्हा परिषदेकडून सुरू आहे. हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उर्वरित रस्ता आणि पुलाच्या कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

---

**अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत बनावट अपंगत्वाच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त्या केल्याबाबत**

**(६) २७१२५ (१७-०९-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत सन २००१ ते २००८ च्या दरम्यान बनावट अपंगत्व प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त्या देण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी झालेल्या गैरव्यवहार प्रकरणासाठी चौकशी समिती नेमण्यात येऊन सदर समितीने आपला अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अकोला यांना सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१), (२), (३) व (४) जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत बनावट अपंग प्रमाणपत्राच्या अनुषंगाने नियुक्ती देण्यासंदर्भात झालेल्या अनियमिततेबाबत तत्कालीन उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेली होती. या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अनियमततेस जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांविरूध्द कारवाई करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दि.२-६-२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**बुलडाणा जिल्हा परिषद अंतर्गत कार्यकारी अभियंत्याची पदे रिक्त असल्याबाबत**

**(७) २८७८७ (२०-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषद अंतर्गत बांधकाम, सिंचन, ग्रामिण पाणी पुरवठा या विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची पदे गेल्या अनेक महिन्यापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विभागात कार्यकारी अभियंता पद रिक्त असल्याने ग्रामिण भागातील विविध विकास कामे प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. बुलढाणा जिल्हा परिषद अंतर्गत बांधकाम, सिंचन विभागातील कार्यकारी अभियंता रिक्त पद अनुक्रमे जाने, २०१६ व नोव्हें, २०१५ मध्ये भरले गेले असून ग्रामिण पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार उपअभियंता बुलढाणा जिल्हा परिषद यांचेकडे आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सद्य:स्थितीत बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता रिक्त पद बदलीने व सिंचन विभागातील कार्यकारी अभियंता रिक्त पद पदोन्नतीने भरण्यात आले असून ग्रामिण पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता पद पात्र अभियंता उपलब्ध झाल्यानंतर पदोन्नतीने भरण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील देऊळगाव माळी येथील**
**कोराडी प्रकल्पात पाणीसाठा कमी झाल्याबाबत**

**(८) ३२६९१ (२२-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगाव माळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील कोराडी प्रकल्पात सुमारे ३.७७ टक्के पाणी साठा उरला असून तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्प व इतर जलस्त्रोतही रिकामी असल्याने माहे ऑक्टोबर, २०१५ पासूनच पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यातील पाणी टंचाई दुर करण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना आखण्यात आल्या आहेत वा येत आहेत,
(३) तसेच या तालुक्यातील कायमस्वरुपी पाणी टंचाई दुर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) नाही.
मेहकर तालुक्यातील कोराडी मध्यम प्रकल्पात उपयुक्त पाणीसाठा निरंक असून मृतसाठा ६.८५ दलघमी साठ्यातून बिगर सिंचनाची मागणी पुर्ण करण्यात येत आहे. तसेच पेनटाकळी व उतावळी प्रकल्पांमध्ये दि.१५.१०.२०१५ रोजी अनुक्रमे ३४.६० दलघमी (५७.७० टक्के) व ८.९६ दलघमी (४५.२८ टक्के) व ८.९६ दलघमी (४५.२८ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. तसेच २८/०१/२०१६ रोजी अनुक्रमे ९.०७ दलघमी (१५.१२ टक्के) व ३.४१ दलघमी (१७.२३ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.
(२) व (३) महसूल व वन विभागाच्या दि.०७.०९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या निर्देशानुसार पाणीटंचाई व पाणी आरक्षणाबाबत उपाययोजना करण्यात येते. त्यानुषंगाने जिल्हा पाणी आरक्षण समिती, बुलढाणा द्वारे कोराडी प्रकल्पातील संपुर्ण पाणीसाठा व पेनटाकळी प्रकल्पातून ३.०४८ दलघमी व उतावळी प्रकल्पातून दुष्काळी परिस्थितीसाठी ०.५० द.ल.घ.मी. पाणीसाठा राखुन ठेवण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी (जि.बीड) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळण्याबाबत

**(९) ३३०२६ (१४-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी तालुक्यातील (जि.बीड) येथील धानोरा खुटेफळ रस्ता (प्र.जि.मा. ०/०० ते ४/०), चोभानिमगांव नांदा फत्तेवडगाव रस्ता (प्र.जि.मा. ०/०० ते ६/०), रा.म.७० ते टाकळसिंग हिंगणी (ई.जि.मा. ०/०० ते ६/०), रा.म. ते लिंबोडी खिळंद (इ.जि.मा. ०/००/ते ७/००), पोखरी ते पांगुळगव्हाण (ग्रामा ०/०० ते ६/००) व रा.म.मा. ते पिंपळगांव घाट (इ.जि.मा. ०/७०० ते ८/२००) या रस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहतुकीस अडचणी निर्माण होत असल्याने सदरहू रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांना रस्ते, पुल दुरुस्ती व परिक्षण कार्यक्रम गट ब सन २०१५-२०१६ अंतर्गत मंजूरी मिळण्याबाबतचा जिल्हा परिषद, बीड यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावातील आष्टी तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) ते (३) जिल्हा परिषद बीड यांच्याकडून अतिरिक्त प्रस्ताव प्राप्त झाला होता. मात्र उपलब्ध निधी व मागणी यांचे प्रमाण व रस्त्याची एकूण लांबी लक्षात घेता जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील कामांना मंजूरी देता आली नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या धानोरा ते कुंठेफळ ह्या रस्त्याच्या २.५० कि.मी.लांबीतील काम मार्च २०१६ च्या अर्थसंकल्पात मंजूर असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. व उर्वरित रस्ता सुस्थितीत आहे. तसेच नांदा ते निमगांवचोभे या प्रजिमा दर्जाच्या रस्त्याच्या ७.०० कि.मी. लांबीची सुधारणा करणेचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नाबार्ड टप्पा-२२ अंतर्गत पाठविण्यात आला आहे.

---

## परभणी येथे इंदिरा आवास अंतर्गत मिळणाऱ्या घरकुलांच्या पुर्णत्वाबाबत

**(१०) ३४३७५ (१४-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा आवास योजना अंतर्गत मिळणाऱ्या घरकुलाची जबाबदारी सेवानिवृत्त अभियंत्यावर सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला होता यासाठी पदभर्तीकडे सेवानिवृत्त अभियंत्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे तब्बल २ हजार २१६ घरकुलांच्या पुर्णत्वास विलंब लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त अभियंते मिळत नसल्याने सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंत्याची नियुक्ती करावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने घरकुल योजना पूर्णत्वास नेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) नाही.

तथापि, पंचायत समिती स्तरावर इंदिरा आवास योजनेबरोबरच इतर केंद्र व राज्य पुरस्कृत योजना राबविल्या जातात. त्यामुळे पंचायत समिती कार्यालयातील कनिष्ठ अभियंत्यावर कामाचा अतिरिक्त बोजा असल्यामुळे त्यांना लाभार्थ्यांना तांत्रिक सहाय्य करण्यात पुरेसा वेळ मिळत नसे.

उपरोक्त अडचण लक्षात घेऊन शासनाने शासन निर्णय क्रमांक:इंआयो-२०१४/प्र.क्र.१०६/यो-१०,दि.१२.०३.२०१५ अन्वये सेवा निवृत्त कनिष्ठ अभियंता/शाल्हा अभियंता/ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कंत्राटी पध्दतीने भरण्यास व उपलब्ध न झाल्यास बाह्ययंत्रणेद्वारे भरण्याचा निर्णय शासनाने घेतला.

(२) नाही.

(३) दि.१२.०३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकही सेवानिवृत्त व बाह्ययंत्रणेकडून अभियंता उपलब्ध न झाल्याने तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (पूर्वीची इंदिरा आवास योजना) व इतर ग्रामीण घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी “ग्रामीण गृहनिर्माण अभियंते” बाह्य यंत्रणेकडून उपलब्ध करून देण्यास ग्राम विकास विभागाच्या दि.२७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे पत्र क्र.३०१/ प्रमआयोग्रा/ग्रा.ग्र.अ/२०१६, दि.३१ मे, २०१६ अन्वये बाह्ययंत्रणेकडून अभियंत्याची नेमणूकीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कासगाव ते आंबळे खुर्द (ता.मुरबाड, जि.ठाणे) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) ३४७५२ (१४-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासगाव ते आंबळे खुर्द (ता.मुरबाड, जि.ठाणे) हा रस्ता सुमारे १९-२० वर्षापूर्वी मंजूर झालेला असून रस्त्याचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता पूर्ण करण्याच्या मागणीसाठी आंबळे खुर्द तसेच साखरे येथील ग्रामस्थांनी दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी तत्कालीन महसूल मंत्री, रोजगार हमी योजना मंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे जिल्हापरिषद, कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम, तहसीलदार, मुरबाड इत्यादींकडे तसेच लोकप्रतिनिधींना निवेदने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंजूर झालेला रस्ता अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहु रस्त्याचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) ते (५) ठाणे जिल्हा परिषदेकडे प्रश्नांकित रस्त्याबाबत निवेदन प्राप्त झालेले नाही.

प्रश्नांकित मुरबाड तालुक्यातील मौजे कासगाव ते आंबेळे खुर्द हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८८ असून सदरील रस्त्याची एकूण लांबी २/२०० कि.मी. इतकी आहे. सदरचा रस्ता हा कासगाव ते आंबेळे खुर्द या गावांना जोडणारा ग्रामीण मार्ग आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते १/२०० कि.मी. लांबीतील खडीकरण डांबरीकरण तसेच कि.मी.१/२०० ते २/०० कि.मी. लांबीतील खडीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुरबाड यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

उर्वरीत २/०० ते २/२०० कि.मी. एवढया रस्त्याची लांबी ही आंबेळे खुर्द ग्रामस्थांच्या मालकीची असून सदरील जागा हस्तांतरणाबाबत त्यांचा विरोध असल्यामुळे सदरील लांबीतील काम करता आलेले नाही. ग्रामस्थांचा जागा हस्तांतरणाचा वाद संपुष्टात आल्यानंतर सदरील रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

कासगांव हे गाव संगम कासगांव किसळ बळेगाव या प्रजिमा ने जोडलेले आहे. तसेच आंबेळे खुर्द हा रस्ता रा.मा.क्र.२२२ ला जोडलेला आहे.

---

### अमरावती जिल्हयात सिंचने असुविधेमुळे सिंचन क्षमतेपेक्षा कमी सिंचन होत असल्याबाबत

**(१२) ३६८०३ (१५-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचनाच्या क्षेत्रात महत्म अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयात सिंचने सुविधे अभावी उपलब्ध असलेल्या सिंचन क्षमतेपेक्षा कमी सिंचन होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचन क्षमतेप्रमाणे सिंचन होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) होय.

अमरावती जिल्हयात पूर्ण मोठे व प्रगतीत असलेल्या मध्यम व लघु प्रकल्पाद्वारे एकूण १२८२३२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. या पैकी मागील तीन वर्षातील प्रकल्पांवरील महत्तम प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ६७२५२ हेक्टर म्हणजे निर्मित सिंचन क्षमतेच्या तुलनेत ५२.४४ टक्के इतके आहे.

(२) खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

२.१) अमरावती प्रदेशात सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व सक्षम व्यवस्थापन यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून अमरावती प्रदेशातील सिंचन व्यवस्थापनासाठी उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ, अमरावती व यवतमाळ सिंचन मंडळ, यवतमाळ हे स्वतंत्र मंडळ कार्यालय निर्माण करण्यात आले आहे.

२.२) पूर्ण झालेल्या प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीसाठी योजनेतर अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयास दिल्या आहेत.
२.३) आवश्यकतेनुसार विशेष दुरुस्तीचे स्वंत्र प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयास दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रतन इंडिया औष्णीक विज प्रकल्प, नांदगांव पेठ, (जि.अमरावती) द्‌वारा पुर्नस्थापना खर्च भरण्यास दिरंगाई होत असल्याबाबत**

**(१३) ३६८२८ (२०-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगांव पेठ (जि.अमरावती) स्थित रतन इंडिया औष्णीक विज प्रकल्पाला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यात आला असून या पाणी पुरवठ्याचा मोबदला म्हणून कौंडण्यपूर बॅरेज करीता रु.२३२ कोटीचा निधी पुर्नस्थापना खर्च म्हणून देण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा निधी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे जमा करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या निधी अंतर्गत कौंडण्यपूर बॅरजचे काम सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत होणा-या विलंबाकरीता दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६)** :(१) होय.
रतन इंडिया औष्णिक विज प्रकल्पाला उर्ध्व वर्धा धरणातून ६७.६० दलघमी पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. यामुळे उर्ध्व वर्धा धरणाच्या प्रभावित २३२१८ हे. लाभक्षेत्रासाठी पुर्नस्थापना खर्च म्हणून रु. २३२.१८ कोटी देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.
(२) रतन इंडिया कडुन मुळ रक्कम रु. १०२.८७ कोटी अधिक व्याजाची रक्कम रु. १३.७० कोटी अशी एकुण रु.११६.५७ कोटी इतकी रक्कम विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे जमा करण्यात आली आहे.
(३) नाही.
कौडण्यपुर बॅरेजचे काम या निधी अंतर्गत करण्यात येणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक महानगरपालिकेचे प्रक्रियामुक्त सांडपाणी जलसंपदा विभागाने इंडिया बुल्स या कंपनीच्या थरमल पॉवर स्टेशनसाठी आरक्षित केल्याबाबत**

**(१४) ३९०६४ (२३-१२-२०१५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेचे प्रक्रियामुक्त सांडपाणी जलसंपदा विभागाने इंडिया बुल्स या कंपनीच्या थरमल पॉवर स्टेशनसाठी आरक्षित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षित पाण्याचे परिमाण किती आहे व या पोटी रॉयल्टी जलसंपदाला मिळणार आहे काय,

(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेचे प्रक्रियामुक्त सांडपाण्याचे रॉयल्टी नाशिक महानगरपालिकेस मिळण्यासाठी प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यावर शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, नागपूर महानगरपालिकेने प्रक्रियामुक्त सांडपाणी शासनाच्या महाजनकोला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाच्या महाजनकोकडून नागपूर महानगरपालिकेस रॉयल्टी मिळते परंतु नाशिक महानगरपालिकेच्या बाबतीत खाजगी कंपनीस रॉयल्टीबाबत सुट देण्यात आली आहे, असल्यास, सुट देण्याबाबतची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, पर्यावरण विभागाच्या महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण २०११/प्र.क्र.२५/ता.क्र.१ दिनांक १ मार्च, २०१४ अन्वये महानगरपालिकांन प्रक्रियामुक्त पाणी शेती, उद्योग इ. यांना देण्याचा अधिकार व महसूल जमा करण्याचा अधिकार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय

(७) असल्यास, याप्रमाणे नाशिक महनगरपालिकेतुन प्रक्रियामुक्त सांडपाण्याची संपुर्ण रॉयल्टीचे अधिकार नाशिक महानगरपालिकेस मिळायला पाहिजे असल्याने त्यानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) होय.

नाशिक महानगरपालिकेचे शुध्दीकरण प्रक्रिया केलेले ८३.४० दलघमी सांडपाणी मे. इंडीया बुल्स च्या औद्योगिक विद्युत निर्मिती प्रकल्पासाठी आरक्षित करण्यात आले आहे.

(२) होय.

सदर कंपनीस टप्पा क्र. १ साठी ४३.८० दलघमी व टप्पा क्र. २ साठी ३९.६० दलघमी पाणी मंजूर केलेले आहे. आरक्षित पाण्याप्रित्यर्थ रॉयल्टी म्हणून टप्पा क्र. १ साठी अनामत रक्कमेची बँक गॅरंटी रु. ७८.१२ लक्ष व पुर्नस्थापना खर्च रु. २६३६.५० लक्ष इतकी व टप्पा क्र. २ साठी अनामत रक्कमेची बँक गॅरंटी रु. ७०.६३ लक्ष व पुर्नस्थापना खर्च रु. ४६२९.०० लक्ष विभागाकडे प्राप्त झालेली आहे.

(३) होय.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रणाबाबतचे प्रारुप धोरण तयार करण्यात आले असून मा.मंत्रीमंडळ मान्यता घेण्यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे.

(४) होय.

नागपूर महानगरपालिकेचे शुध्दीकरण प्रक्रिया केलेले सांडपाणी महाजेनकोला देण्यासाठी त्या दोन संस्थांमध्ये करारनामा करण्यात आला आहे.

(५) हे खरे नाही.

महाजनको नागपूर महानगरपालिकेस रॉयल्टी देत नाही. परंतु महाजनको व महानगरपालिका यांचे करारनाम्यामधील परिशिष्ट - ५ नुसार महाजनको नागपूर महानरगरपालिकेस विशिष्ट रक्कम अदा करणार आहे.

(६) होय.

(७) राज्यातील सांडपाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रणाबाबतचे प्रारुप धोरण तयार करण्यात आले असून मा.मंत्रीमंडळ मान्यता घेण्यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे.

---

**चांदोली (जि.कोल्हापूर) धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१५) ३९९७५ (१४-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली (जि.कोल्हापूर) धरणग्रस्तांचे चांदोली धरण परिसरात दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजीपासून आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणग्रस्तांना ३९ वर्षे होवूनही दिलेल्या जागेवर पक्की घरे वा मूलभूत सोयीसुविधा देण्यात आलेल्या नाहीत तसेच नियमाप्रमाणे त्यांचे लाभक्षेत्रात पुनर्वसन करणे गरजेचे असतांनाही या धरणग्रस्तांचे त्या पध्दतीने पुनर्वसन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) नाही.

चांदोली (वारणा प्रकल्प) धरणग्रस्तांचे वारणा प्रकल्प लाभक्षेत्रात शासन नियमाप्रमाणे पुनर्वसन केले आहे. वारणा प्रकल्पाच्या सर्व प्रकल्पाग्रस्तांचे पुनर्वसन कोल्हापूर व सांगली जिल्हयातील २६ वसाहतीमध्ये करण्यात आले असून नागरी सुविधांची ९०% कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे प्रथतीपथावर आहेत. धरणग्रस्तांना पक्क्या घरांसाठी घरबांधणी अनुदान दिले आहे.

चांदोली (वारणा) धरण प्रकल्प हा सन १९७६ पूर्वीचा प्रकल्प असल्याने, सदर प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी मदत व पुनर्वसन विभागाकडून प्रकल्पयंत्रणेस विभागीय आयुक्त, पुणे यांचेमार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदर प्रकल्पांतर्गत नागरी सुविधा कामांसाठी सन २०१५-१६ मध्ये मागणीनुसार रुपये ४६२. ६९ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तासगाव, कवठेमहाकाळ, जत तालुक्यांना म्हैसाळ योजनेचे पाणी मोफत देण्याबाबत

**(१६) ३९९७७ (०४-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाळ उपसा सिंचन योजना चालविण्यासाठी आगाऊ पाच कोटी रुपये भरा एक महिना पाणी सोडू, पुढच्या महिन्याचे पाच कोटी रुपये तयार ठेवले तरच पाणी चालू ठेवू असे मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी सांगलीच्या विश्रामगृहात दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत तेथील शेतकऱ्यांना सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या बैठकीत सदरची योजना पूर्ण नाही सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही दुष्काळी भाग असल्याने पाणी मोफत देण्याची तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली असता सदर मागणी अमान्य करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, तासगाव, कवठेमहाकाळ, जत हे तालुके कायम दुष्काळी असल्याने दुष्काळी भागांना दिल्या जाणाऱ्या सवलती या तालुक्यांना मिळणाच्या दृष्टीने म्हैसाळ योजनेचे पाणी मोफत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) पाणी मोफत देण्याची मागणी करण्यात आलेली नाही. तथापि, योजनेचे विद्युत देयक टंचाई अंतर्गत शासनाने भरावे अशी मागणी करण्यात आली होती, सदरची मागणी अमान्य करण्यात आली.

(३) दुष्काळी भागांना दिल्या जाणाऱ्या सवलती तासगांव, कवठेमहांकाळ, जत या तालुक्यांना लागू करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने महसुल व वनविभागाच्या दि.२०/१०/२०१५ च्या शासन निर्णयानुसार योजनेच्य चालू वीज देयकात ३३.५०% इतकी सूट देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाणी उपसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत घट होवून पाणी टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(१७) ४०४१५ (०४-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यात सन २०१५ मध्ये केवळ ४७ टक्के पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यातील सर्वच धरणांमधील गेल्या ५० वर्षामध्ये निचांकी पाणीसाठा झाला असून मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात ऊसाचे व रब्बी पिकांचे क्षेत्र जास्त असल्यामुळे माहे ऑक्टोबर २०१५ पासूनच नदी काटावरील शेतकऱ्यांनी शेतीसाठी पाणी उपसा करण्यास सुरूवात केल्यामुळे माहे जानेवारी, २०१६ पासून नद्यांच्या पाणी पातळीत घट होवून तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाटबंधारे विभागाने केलेली उपसा बंदी तोडून अनेक शेतकऱ्यांनी पाण्याचा उपसा केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापुर जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील धरणांमध्ये दिनांक १५/१०/२०१५ रोजी ८५ टक्के पाणीसाठा झाला होता.
(२) नाही.
(३) अंशत: खरे आहे.

चिकोत्रा नदीवर तुरळक ठिकाणी उपसा बंदीच्या काळात उपसा केल्याचे निदर्शनास आले असून संबंधित शेतकऱ्यांवर नियमानुसार शिक्षेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) कोल्हापूर जिल्ह्यातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवून उर्वरित सिंचनासाठी आवश्यक त्या प्रकल्पांमध्ये आवर्तनाप्रमाणे किंवा पूर्णपणे उपसाबंदी लागू केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुकडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) धरणाच्या डावा कालवा पिंपळवाडी, येसवडी या भागातील कालव्याचे अस्तरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१८) ४०५३२ (०४-०५-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुकडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) धरणाच्या डावा कालवा पिंपळवाडी, येसवडी या भागातील कालव्याचे अस्तरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट पध्दतीने झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामाचे स्टक्चरल ऑडीट करण्यात येवून गुन्हा नियंत्रणामार्फत चौकशी करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित तहसिलदारांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तदनुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) अंशत: खरे आहे. दि.२४.०२.२०१६ रोजी ग्रामस्थांचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) कामाचे गुणवत्तेबाबत गुणनियंत्रण विभागामार्फत वेळोवेळी तपासणी केली असून आवश्यक ती पुर्तता क्षेत्रिय स्तरावरून करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आळंदी धरण हे दारणा धरण समुहात असल्याचे दाखवून दिशाभूल करण्यात आल्याबाबत**

**(१९) ४०८१९ (१४-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरण समूहातील जलाशयामधील पाणी पैठण धरणात सोडण्यासाठी दिनांक १७ ऑक्टोंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाने काढलेल्या आदेशात आळंदी धरण हे दारणा धरण समुहात असल्याचे दाखवून न्यायालयाची व जनतेची दिशाभूल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची विविध संस्थांनी दिनांक २४ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) महाराष्ट्र जलप्राधिकरण सदस्यांच्या भूमिकेबाबत विधानसभेतील विरोधी पक्ष नेत्यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये नाराजी व्यक्त केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरण समुहातील समन्यायी पाणी वाटपाच्या विवादात मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दि.१९ सप्टेंबर, २०१४ रोजी निवाडा दिला असून या निवाड्यानुसार गोदावरी खोऱ्यातील जायकवाडीच्या उर्ध्व भागातील धरण समुहातील आळंदी धरण हे गोदावरी-दारणा धरण समुहात दर्शविलेले आहे. त्यानुसारच महामंडळाचे दि.१७.१०.२०१५ चे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) होय.

मा.आमदार जयंतराव जाधव विधान परिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये दि.१४.१२.२०१५ च्या पत्राने आळंदी धरण हे दारणा धरण समुहात असल्याचे दाखवून न्यायालयाची व जनतेची दिशाभूल केली आहे अशा आशयाचा स्थगन प्रस्ताव मांडला आहे.

(३) विधानसभेतील विरोधी पक्षतेना यांचे दि.२३/१२/२०१५ चे पत्रानूसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

(४) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांनी त्याचे पत्र क्र. गोमपाविम/तां-१/२५६३, दि.१५/०३/२०१६ अन्वये मा.विरोधी पक्षनेता यांना वस्तुस्थिती अवगत केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील घरकुल योजनेंतर्गत पात्र असलेले लाभार्थी घरकुल योजनेंपासून वंचित असल्याबाबत

**(२०) ४०९०१ (०५-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील येथील दारिद्रय रेषेखालील घरकुल योजनेंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थ्यांची यादी तालुकास्तरावरून रत्नागिरी जिल्हा परिषद प्रशासनाकडे सादर करण्यात आली असतानाही सदरहू तालुक्यातील ३ गावांतील २९ लाभार्थ्यांना आजमितीस घरकुल योजनेंपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या विभागाकडे पत्र पाठवून आदेशही दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजमितीस सदरहू २९ घरकुल योजनेंतर्गत घरकुले न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू दारिद्रय रेषेखाली घरकुल योजनेंतर्गत पात्र असलेल्या लाभार्थींना विनाविलंब घरकुले देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) विभागीय आयुक्त (कोकण विभाग) यांच्याकडे सादर केलेल्या एकत्रित यादीत सदरहू २९ लाभार्थ्यांचे नावे ग्रामपंचायत मार्फत समाविष्ट न केल्याने लाभ देता आला नाही.

(४) सन २०१६-१७ पासून इंदिरा आवास योजनेचा रुपांतर "प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण" मध्ये करणेत आले आहे. या योजनेचा लाभ देण्यासाठी SECC-२०११ डेटा वापरुन लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. सदर लाभार्थ्यांची नावे SECC DATA मधील Priority List यादीत असल्यास ग्रामसभेने निवड केल्यास व जिल्हास्तर समितीने मान्यता दिल्यास लाभ देता येऊ शकेल. तसेच, Priority List मध्ये नाव नसल्यास आणि ग्रामसभेद्वारे नावे सूचविलयास अथवा लाभार्थ्यांने स्वत: जिल्हास्तर समितीकडे तालुकास्तर समितीमार्फत अपील केल्यास प्रतिक्षा यादीत नावे समाविष्ट कण्याबाबतचा योग्य तो निर्णय जिल्हास्तर समितीमार्फत शासनाचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाण्याची टंचाई असताना नर्सरीत होत असलेला पाण्याच्या बेसुमार वापराबाबत

**(२१) ४१९७६ (०५-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील पवना धरणात फक्त ५७ टक्के पाणीसाठा शिल्लक असताना परिसरातील नर्सरीसाठी पाण्याचा बेसुमार वापर केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजची पाण्याची गरज भागविण्यासाठी धरणातून दररोज साडेपाच तास बाराशे क्युसेक्सप्रमाणे पाणी सोडले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, झाडांना सध्या दररोज लाखो लिटर पाणी घातले जाते, हे पाणी घालण्यासाठी ठिबक सिंचन किंवा तुषार सिंचनाची व्यवस्था करणे गरजेचे आहे परंतु अपवाद वगळता अशी सोय कोणीही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाण्याचा बेसुमार वापर करणाऱ्या नर्सरी धारकांना पाटबंधारे विभागाच्या वतीने आवश्यक त्या सूचना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) पवना धरणाच्या शिर्ष विमोचकाची विसर्ग क्षमता १२०० घनफूट प्रतिसेकंद इतकी असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस पिण्यासाठी तसेच सिंचनासाठी व बिगर सिंचनासाठी धरणातून मागणीनुसार पाणी सोडले जाते.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**१४ व्या वित्त आयोगानुसार थेट ग्रामपंचायतींना निधी देऊन जि.प. सदस्य व प.स. समिती यांना विकासापासून वंचित ठेवल्याबाबत**

**(२२) ४२९९७ (०३-०५-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने १४ व्या वित्त आयोगानुसार थेट ग्रामपंचायतींना निधी देऊन जि.प. सदस्य व प.स. समिती यांना विकासापासून वंचित ठेवले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी बंद करुन सदर सदस्यांना पूर्णपणे अधिकारमुक्त पदाधिकारी केले आहे तसेच सदर सदस्यांचे शिक्षक बदली व इतर अधिकारी याआधी कमी केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सदस्यांना विकास निधी देण्यासोबतच शिक्षक बदली व इतर अधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

चौदाच्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण निधी केवळ ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करावयाचा आहे. त्यानुसार राज्य स्तरावर अंमलबजावणी होणे आवश्यक असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, चौदाव्या वित्त आयोगाचा निधी ग्रामपंचायत स्तरावर वितरणाबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. ग्राम पंचायतींनी सदरचा निधी खर्च करताना ग्राम पंचायत स्तरावर "आमचा गाव, आमचा विकास" या कार्यक्रमातंर्गत विकास आराखडा तयार करून गरजांचा प्राधान्यक्रम निश्चित करून खर्च करणे आवश्यक आहे. ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करताना "आमचा गाव, आमचा विकास" या कार्यक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींशीही विचारविनिमय करणेबाबत नमूद केले आहे. अशाप्रकारे ग्राम विकासामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य यांचा सक्रिय सहभाग असणार आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना शिक्षक बदल्यांचे कोणतेही अधिकार दिलेले नव्हते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजापूर (जि. रत्नागिरी) येथील नद्यांमधील गाळ काढण्याबाबत**

**(२३) ४३४७४ (०३-०५-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि. रत्नागिरी) येथील शहरात दरवर्षी पूराच्या पाण्याचा त्रास होऊन शहराचे जनजीवन तसेच वाहतूक विस्कळीत होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील कोदवली व अर्जुना अशा दोन नद्यांतील गाळ काढावा अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व नागरिकांनी अनेक वर्षे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील यांत्रिकी विभागामार्फत कोदवली व अर्जुना या दोन नद्यांतील गाळ काढण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. अद्याप पर्यंत कोदवली व अर्जुना नदीतील १९८.७८ स.घ.मी.पैकी १४०.३० स.घ.मी. इतका गाळ काढण्यात आलेला आहे. निधीच्या उपलब्धेनुसार उर्वरित गाळ काढण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२४) ४३६४९ (१३-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील चासकमान धरणाच्या डाव्या कालव्याचे अस्तरीकरण न झाल्याने खेड तालुक्यातील जमीनी पाण्याच्या गळतीमुळे नापीक होऊन खारवट झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालवा अस्तरीकरणासाठी सन २००६ मध्ये भरीव तरतूद होऊनही हे काम अद्याप पूर्ण केरण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरुर व खेड भागातील मोठी गळती थांबविण्यासाठी १० कोटी रुपये मागणी प्रस्ताव अधिक्षक अभियंता जलसंपदा, पुणे यांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चासकमान डाव्या कालव्याची गळती थांबविण्यासाठी (ढारे बुजविण्यासाठी) शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) चासकमान डावाकालवा हा अस्तरीकरणासह संकल्पीत आहे. अस्तरीकरणाअभावी मुरूम भूस्तरातून जाणाऱ्या कालव्याच्या भागातून तसेच रोजगार हमी योजना मार्फत ३० ते ३५ वर्षापूर्वी कार्यान्वित झालेल्या भरावाचे भागातून काही ठिकाणी कालव्यातून पाझर होत आहे. तथापि, तालुक्यातील जमिनी गळतीमुळे नापिक झाल्या हे खरे नाही.

(२) सन २००६-०७ मध्ये अस्तरीकरणाचे काम हाती घेण्यात आले तथापि सुधारित प्रशासकीय मान्यता व पुरेशा निधी अभावी हे काम पुर्ण होवू शकले नाही.

(३) नाही.

(४) डाव्या कालव्याच्या ६७ किमी लांबी पैकी १६ किमी मधील अस्तरीकरण पुर्ण झालेले आहे. अद्याप ५१ किमी लांबीचे अस्तरीकरणचे काम शिल्लक आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर सदर काम हाती घेण्यात येईल.

दरम्यान चासकमान डावा कालवा कि.मी. ०१ ते ९२ व कि.मी. ९३ ते १४४ या भागातील गळती प्रतिबंधक कामासाठी विशेष दुरूस्तीची अंदाजपत्रके तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर, रायगड व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पाच ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्य यांनी केलेला गैरव्यवहार**

**(२५) ४४२५९ (३०-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, रायगड व सिंधुदूर्ग जिल्हयातील सरकारी रक्कमेचा अपहार बरोबरच अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्याचा ठराव संमत करणे व त्यासाठी लाच स्वीकारणे आणि रस्त्याची कामे पूर्ण होण्याआधीच कंत्राटदारांना कामाचे संपूर्ण देयक अदा करणे असे गंभीर आरोप सिध्द झालेल्या पाच ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्य अशा ११ पदाधिका-यांना पदच्युत करण्याची कारवाई दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास कोकण विभागीय आयुक्तांनी केली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागीय आयुक्तांनी सदरहू ११ पदाधिका-यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) होय. पालघर जिल्हयातील पाम व अक्करपट्टी, रायगड जिल्हयातील धुतूम व भागाड तसेच सिंधुदूर्ग जिल्हयातील तारकर्ली या पाच ग्रामपंचायतीच्या ११ पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) अन्वये पदावरून काढून टाकण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे दिनांक २९/१२/२०१५ च्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) **अ)** ग्रामपंचायत पाम, ता.जि.पालघर येथील श्री.सचिन लोखंडे या गावात दिव्यराज डेव्हलपर्स तर्फे भागीदारीत गृहसंकुलाचे बांधकाम करीत आहेत. सदर गृहसंकुल बांधकामास कोणताही अडथळा केला जाणार नाही याची हमी देऊन त्या मोबदल्यात श्री. अशोक वडे, ग्रामपंचायत सदस्य, पाम यांनी स्वत:साठी लाचेची मागणी करून स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेतला आहे.

**ब)** ग्रामपंचायत अक्करपट्टी, ता.जि. पालघर चार रस्त्यांची कामे मंजूर करून सदरच्या कामाची निविदेची रक्कम कॅशबुकला जमा झाल्याचे दिसत नाही. तसेच ठेकेदाराला मुल्यांकनापेक्षा जादा रक्कम देवून निधीचा गैरव्यवहार केलेला आहे.

**क)** ग्रामपंचायत धुतूम, जि.रायगड प्रकरणी कोणताही अपहार दिसून येत नाही. परंतु सदरच्या रकमा ह्या ठरावाशिवाय व बेकायदेशीर काढलेल्या आहेत त्यामुळे प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येते.

**ड)** ग्रामपंचायत भागड, जि.रायगड ग्रामपंचायतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार व अपहार झालेला असून त्यास जबाबदार ग्रामसेवकास निलंबित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ५७ (३) अन्वये ग्रामनिधी, ग्राम पाणी पुरवठा निधी आणि पंचायतीच्या नावे वेळोवेळी मिळणाऱ्या इतर रकमा यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी, सचिव आणि सरपंच हे संयुक्तपणे जबाबदार असतील त्यानुसार तत्कालीन सरपंच देखील कारवाईस पात्र आहेत.

**इ)** ग्रामपंचायत तारकर्ली, जि.सिंधुदूर्ग येथील CRZ हद्दीमधील विनापरवाना बांधकामावर ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५२ नुसार कारवाई न करता मासिक सभेत

विनापरवाना, CRZ मधील पक्के बांधकामावर ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५२ (४), (५ अ), (५ ब) अन्वये कारवाई करू नये असा ठराव उपस्थित सहा सदस्यांनी मंजूर केला आहे.

(४) १) ग्रामपंचायत पाम, जि.पालघर येथील श्री. अशोक वडे, ग्रा.प. सदस्य, २)ग्रामपंचायत अक्करपट्टी, जि.पालघर येथील श्रीमती हेमांगी हेमंत राऊत, सरपंच, ३) ग्रामपंचायत धुतूम, जि.रायगड येथील श्रीमती अर्चना चेतन ठाकूर, सरपंच, ४) ग्रामपंचायत भागाड, जि.रायगड येथील श्रीमती राजश्री रघुनाथ कदम, तत्कालीन सरपंच, ५) ग्रामपंचायत तारकर्ली, मालवण, जि. सिंधुदूर्ग येथील श्री. मोहन शंकर केळुसकर, सरपंच, श्री.गजानन विश्राम कुबल, उपसरपंच, श्रीमती स्नेहा राजन मोरजकर, श्रीमती सुमन संभाजी तावडे, श्रीमती सरोज विठोबा बटा व श्री. महेश मोहन मयेकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य अशा एकूण ११ पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) अन्वये पदावरून काढून टाकण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुधगंगानगर (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) राजर्षी शाहू धरण प्रकल्पावर उभारण्यात आलेली भूकंप तीव्रता मापन वेधशाळा सूरू करण्याबाबत**

**(२६) ४४७२६ (२८-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधगंगानगर (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) राजर्षी शाहू धरण प्रकल्पावर उभारण्यात आलेली भूकंप तीव्रता मापन वेधशाळा गेल्या तीन-चार वर्षापासून बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वेध शाळा बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही वेध शाळा सूरू करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) होय.

(२) या वेध शाळेतील उपकरणे जुनी झाली आहेत.

(३) अद्ययावत डिजीटल उपकरणे बसविण्याबाबत क्षेत्रिय स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन प्रकल्प निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२७) ४५३४४ (०३-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन प्रकल्प निधी अभावी गेली २० वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, या प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करुन हा प्रकल्प पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :** (१) प्रकल्प अपूर्ण अवस्थे आहे हे खरे आहे. मा.राज्यपाल महोदयांचे निधीवाटप बाबतचे सुत्रानुसार कृष्णा खोरे विकास महामंडळास मिळणारा निधी व महामंडळातील बांधकामाधीन प्रकल्पांची निधीची गरज विचारात घेऊन प्रकल्प निहाय निधी वाटप करण्यात येते. प्रकल्पाची व्याप्ती मोठी असलेने प्रकल्प पुर्णत्वासाठी आवश्यक निधी उपलब्ध होऊ शकलेला नाही.
(२) व (३) **(अ)** टेंभू उपसा सिंचन प्रकल्पास रुपये १४१६.५९ कोटी किंमतीस शासनाने दिनांक १९.२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये मुळ प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दि.२२.१.२००४ रोजी संबंधित महामंडळाने रुपये २१०६.०९ किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रकल्पाची अद्यावत किंमत रुपये ४८१५.२१ कोटी इतकी असून त्यावर माहे मार्च, २०१६ अखेर रुपये १९३५.५५ कोटी इतका खर्च झाला आहे.

**(ब)** प्रकल्पिय सिंचन क्षमता ८०४७२ (ICA) असुन माहे जून, २०१५ अखेर ६३५६ हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

**(क)** या योजनेस सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रुपये ८०.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे व निधीच्या उपलब्धतेनुसार या योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन योजनेच्या घाणंद-हितवड कालव्यातून**
**खरसुंडी येथे बंधारा गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२८) ४५३५३ (३०-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन योजनेच्या घाणंद-हितवड कालव्यातून खरसुंडी (ता.आटपाडी) येथे बंधारा बांधून बाळेवाडी, बनपूरी, तडवळे, करगणी, शेटफळे इत्यादि गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा राज्यमंत्र्यांना पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने उपरोक्त गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) प्रस्तुत मागणी बाबत क्षेत्रिय स्तरावरून प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून त्या कामाकरिता किमान रूपये ४ कोटी इतका खर्च अपेक्षित असल्याच्या संबंधित महामंडळाचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत घाटनांद्रे उपसा योजनेमध्ये खानापूर तालुक्यातील पळशी, बाणूरगड, हिवरे, कुसबावडे, ताडाचीवाडी इत्यादी गावाचा समावेश करण्याबाबत**

**(२९) ४५३५४ (२८-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभू (जि.सांगली) उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत घाटनांद्रे उपसा योजनेमध्ये खानापूर तालुक्यातील पळशी, बाणूरगड, हिवरे, कुसबावडे, ताडाचीवाडी इत्यादी गावाचा समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गावांचा समावेश न झाल्यामुळे सदर गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावांना तात्काळ पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे पत्र दि.२३.०२.२०१५ अन्वये खानापूर तालुक्यातील २१ गावांचा टेंभू योजनेत समावेश करण्याबाबत मा.मंत्री (जलसंपदा) यांना पत्र दिले होते.

या २१ पैकी ५ गावे टेंभू योजनेच्या लाभक्षेत्रात आधीपासून समाविष्ट आहेत. उर्वरित १६ गावे ही लाभक्षेत्राबाहेरील आहेत. प्रकल्पाचे मंजूर जल नियोजना नुसार या १६ गावांना सिंचनाचा लाभ देणेसाठी अतिरिक्त पाणी उपलब्ध नाही.
(३) तहसिलदार, खानापूर विटा यांच्या दि.१८.५.२०१६ च्या अहवालानुसार खानापूर तालुक्यातील उपरोक्त गावांपैकी पळशी, बाणुरगड, हिवरे व ताडाचीवाडी येथे पिण्यासाठी टँकर ने पाणीपुरवठा चालु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील उंचगी, आंबेमोहोळ व सर्पनाला या तीन प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३०) ४५३६८ (०३-०५-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील उचंगी, आंबेमोहोळ व सर्पनाला या तीन प्रकल्पांची कामे आजपर्यंत पूर्ण झाली नसल्याची बाब माहे मार्च, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्प व प्रकल्प बाधीतांच्या पुनर्वसनाचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) होय. मुख्यत्वे पुनर्वसनाच्या अडचणीमुळे उचंगी, आंबेओहोळ व सर्फनाला या तिन्ही प्रकल्पांची कामे अपूर्ण आहेत. पुनर्वसन कार्यवाही पूर्ण झालेखेरीज प्रकल्पाचे काम करणेस प्रकल्पग्रस्तांचा विरोध आहे. प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अंतर्गत लाक्षक्षेत्रातील जमीन वाटप करणे ही बाब प्रलंबित आहे. पुनर्वसन कार्यवाही पूर्ण होणेबाबत विविध स्तरावरुन बैठका आयोजित करुन तसेच प्रधान सचिव (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त, पुणे यांचे समवेत दि.०५/०९/२०१५ रोजी बैठक घेऊन त्याप्रमाणे पुनर्वसन प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणाला जोडणारा कुंभवडे-जांबरे रस्ता तयार करण्याबाबत**

**(३१) ४५३७३ (३०-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणाला जोडणाऱ्या सर्वाधिक जवळच्या कुंभवडे-जांभरे रस्ता तयार करण्याची मागणी मा. ग्रामविकास राज्यमंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) या विभागाकडे अशा प्रकारची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यातील रस्ते विकास आराखड २००१-२०२१ नुसार चंदगड कोकरे न्हावेली उमगांव झांबरे ते जिल्हा हद्द चौकुळ हा रस्ता इतर जिल्हे मार्ग १६२ दर्जाचा असून त्याची एकूण लांबी १५ कि.मी. इतकी आहे.

चंदगड ते झांबारे पर्यंतच्या १०.६० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या सुधारणेचे काम सन २००९-२०१० मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण केलेले आहे.

झांबरे मध्यम प्रकल्पाच्या उजव्या बाजूस कोल्हापूर जिल्हा हद्दी पर्यंत म्हणजे १०.६०० ते १५.०० कि.मी. पर्यत ४.४०० कि.मी. इतर जिल्हा मार्ग १६२ ची लांबी वनविभागाच्या हद्दीतून जात असून सदर ४.४०० कि.मी. ची लांबी अपृष्ठांकित पायवाट स्वरूपाची आहे व पुढील कोल्हापूर जिल्हा हद्द ते प्रजिमा ७५ पर्यंतची सिंधुदूर्ग जिल्हयातील ४.४०० कि.मी लांबी वनविभागाच्या हद्दीतून जाणारी अपृष्ठांकित पायवाट स्वरूपाची आहे. त्यामुळे प्रश्नांकित झांबरे ते कुंभवडे पर्यंत सुमारे ८.५० कि.मी. रस्त्याची लांबी कोल्हापूर व सिंधुदूर्ग जिल्हयाच्या डोंगरी भागातील वनविभागाच्या हद्दीतून जाणारी असल्याने वनविभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे कोल्हापूर जिल्हयातील ४.४०० कि.मी. लांबीतील रस्त्याची सुधारणा करण्यासाठी जिल्हा परिषद कोल्हापूरने दि.७.६.२०१६ च्या पत्रान्वये वन खात्याकडे परवानगी मागितली आहे.

---

### आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील मोरेवाडी व चाफवडे रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(३२) ४५३९१ (२९-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील वाटंगीपैकी मोरेवाडी व धनगरवाड्याजवळील ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी असलेल्या मोरेवाडी व चाफवडे रस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहतूकदारांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता तत्कालीन खासदारांच्या खासदार निधीतून २० वर्षापूर्वी बांधण्यात आला असून या रस्त्याची दुरुस्ती व देखभाल वेळच्यावेळी न झाल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) प्रश्नांकित रस्त्याची किरकोळ दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तथापि, सदर रस्त्यावर वाहतूक सुरू आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) व (५) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ६५४१.२५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ५२५०.७९ कि.मी. इतकी आहे कोल्हापूर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल, दुरूस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी एकूण रू.४१९६.६१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगा अंतर्गत एकूण रू.६७१.९० लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रू.८०४.७० लक्ष असा एकूण रू. ५६७३.२१ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी व शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या याचे प्रमाण व्यस्त आहे.

प्रश्नांकित मोरेवाडी ते धनगरवाडी रस्ता हा रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र.११८ असून त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या दुरूस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील मांडेदुर्ग-सुंडी रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३३) ४५४०९ (२९-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडेदुर्ग-सुंडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) प्रश्नांकित रस्त्याची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली हे खरे नाही. सद्यस्थितीत या मार्गावर वाहतुक सुरू आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) व (४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी.

इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्य लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकुण लांबी ६५४१.२५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ५२५०.७९ कि.मी. इतकी आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल, दुरूस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी एकूण रू.४१९६.६१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगा अंतर्गत एकूण रू.६७१.९० लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रु.८०४.७० लक्ष असा एकुण रू.५६७३.२१ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुका हा अतिदुर्गम व डोंगराळ अतिपावसाचा आहे. त्यामुळे रस्ते खराब होण्याचे प्रमाण जास्त आहे. प्रश्नांकित मांडेदुर्ग ते सुंडी हा ग्रामीण मार्ग क्र.३३ असून त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. प्रश्नांकित रस्त्याची दुरूस्ती जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**साक्री तालुक्यातील उमरपाटा परिसरातील खैरखुंटा येथील गोदडनाला (पश्चिम वाहिनी गुजराथ वाहिनीवर) नाल्यावर लघु एम.आय.टँक मंजूर करण्याबाबत**

**(३४) ४५५०७ (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील उमरपाटा या अतिदुर्गम परिसरातील खैरखुंटा येथे गोदडनाला (पश्चिम वाहिनी गुजराथ वाहिनीवर) नाल्यावर सुमारे ५५-६० एस.सी.एफ.टी क्षमतेचा लघु एम.आय.टँक मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावशिवारात एक ही एकर क्षेत्र बागायत नाही, प्रस्तावित एम.आय.टँक झाल्यास सुमारे ४०० ते ५०० हेक्टर जमीन ओलिताखाली आली असल्यामुळे गावकऱ्यांची मागणी शासनाने मान्य केली वा करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) गावकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने खैरखुंटास्थळी साठवण तलावाचे सर्वेक्षण करण्यात आले असून साठवणे तलावासाठी आवश्यक बांधकाम साहित्य (कवच साहित्य वगळता) नजिकच्या परिसरात उपलब्ध नसल्याने योजना शासनाच्या आर्थिक प्रचलित मापदंडात बसत नाही. त्यामुळे योजनेस प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) वरीलप्रमाणे कार्यवाही झाली असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग जिल्हयातील तिलारी आंतरराज्य प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३५) ४५८२९ (०३-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील तिलारी आंतरराज्य प्रकल्पाचे काम अंदाजे ३५ वर्षापूर्वी सुरु करण्यात आले असुन या प्रकल्पाच्या डाव्या-उजव्या कालव्यातील पिचिंगची कामे निकृष्ट दर्जाची व अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचा डावा-उजवा कालवा खचला असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असल्यामुळे या कालव्याच्या कामाची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधीने मा.मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या प्रकल्पांतर्गत फूटणारे कालवे, पोट कालव्यांची कामे अपूर्ण असून प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना एक रक्कमी अनुदान पुनर्वसन गावठाणातील समस्यांबाबत ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात पाटबंधारे विभागाचे सचिव व मुख्य अभियंता यांनी केलेल्या पहाणी दौ-यात तक्रारी करुन चौकशी करावी याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय त्यात दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, सदर प्रकल्पाचे कालव्याचे काम मजबुत राहण्यासाठी योग्य प्रतीचा कामाचा आराखडा तयार करावा तसेच सिंचन क्षेत्रापर्यंत पाणी पोहचण्यासाठी अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच महाराष्ट्र राज्य सिंचन निधीअभावी प्रलंबित असल्यामुळे हे सर्व प्रकल्प पंतप्रधान निधीतून पूर्ण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय व यावर अंमलबजावणी केव्हापर्यंत होणार आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) तिलारी आंतरराज्य प्रकल्पाच्या डावा कालवा व उजव्या कालव्याची कामे सन १९८१-८२ मध्ये सुरु होऊन उजव्या कालव्यातून सन २००१ पासून व डाव्या कालव्यातून सन २००३ पासून सातत्याने पाणीपुरवठा सुरु आहे. तसेच कालव्यावरील पिचिंगची कामे उचित गुणवत्तेची आहेत. त्यांचे गुणवत्तेबाबत गुणनियंत्रण विभाग/उपविभागामार्फत निरीक्षण झालेले आहे. बांधकामाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक व संकल्पचित्र विभाग (को.प्र.) नवी मुंबई यांचेमार्फत करण्यात येते.

सदर प्रकल्प सन २००५-०६ पासून AIBP अंतर्गत समाविष्ट होता.

तिलारी प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने अंतर्गत समावेश करण्यात आला असून सन २०१५-१६ या वर्षापासून केंद्रीय अर्थसहाय्यातून अंशत: निधी प्राप्त झाला आहे.
(७) प्रश्‍न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील पंचायत समिती मेहकर येथील सामान्य निधीची १३ प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत**

**(३६) ४६१५७ (२५-०४-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील पंचायत समिती मेहकर येथील सन २०१२-१३ पुर्वी निदर्शनास आलेले सामान्य निधीची १३ प्रकरणे प्रलंबीत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पंचायत समिती मध्ये ज.रा.यो./स.ग्रा.रो.ह.यो, निधीचे ३५ प्रकरणातील अद्‌यापही १० लक्ष रुपयांची वसूल बाकी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१२-१३ पुर्वीची प्रकरणे असुन सुध्दा अद्‌यापही निकाली काढण्यात आली नसल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

पंचायत समिती मेहकर येथील सन २०१२-१३ पूर्वी निदर्शनास आलेल्या सामान्य निधीच्या एकूण १३ प्रकरणांपैकी ३ प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली असून त्यामधील वसूलपात्र रक्कम रू.६,४५०/- चे वसुलीची कार्यवाही सुरू आहे. तसेच ज.रा.यो/ सं.ग्रा.रो.ह.यो, निधीच्या एकूण ३५ प्रकरणांपैकी २१ प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली असून त्यामधील वसुलपात्र रक्कम रू.४,२४,५१९/- ची वसुली करण्यात आलेली असून २१ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.
(४) गैरव्यवहारामधील काही ग्रामसेवक व सरपंच मयत झाले असून काही ग्रामसेवकांचे इतर पंचायत समितीमध्ये स्थानांतर झालेले आहे. काही ग्रामसेवक सेवानिवृत्त झाले असून त्यांच्या भविष्य निर्वाह निधी मधून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

---

**गंगापूर धरणाच्या सुरक्षेबाबत करावयाच्या उपाययोजना**

**(३७) ४६६६१ (०३-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक सह अहमदनगर, मराठवाडयाची तहान भागविणाऱ्या गंगापूर धरणावर सुट्टीच्या दिवशी मद्यापान करुन गोंधळ घालत असल्याच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास स्थानिक नागरिकांनी जलसिंचन विभागाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीवर जलसिंचन विभागाने अद्यापर्यंत कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या धरणावर टवाळखोरांचा त्रास बंद करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-१०-२०१६) :** (१) नाही.
अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सद्य:स्थितीत धरणावर पोलीस निगराणीची व्यवस्था केली आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या आस्थापनेतून सुरक्षा पुरविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(३८) ४६७७८ (३०-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा तालुकयामध्ये माहे डिसेंबर व जानेवारी २०१५-२०१६ मध्ये कोदे, कुंभी-कासारी या मुख्य धरणातील व पडसाळी आणि पोंबरे, ता.पन्हाळा या पाटबंधारे तलावामध्ये कमी पाऊस झाल्याने पाण्याचा साठा पूर्ण क्षमतेने झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिवाळ्यापासूनच तालुक्यातील जांभळी, धामणी व कासारी या नद्यांमध्ये जलाशयातून पाणी सोडण्याची वेळ येऊन उन्हाळ्यामध्ये पाण्याची भिषण टंचाई जाणवणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संभाव्य पाणी टंचाईवर उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) नाही.
दि.१५/१०/२०१५ रोजी ९९% पाणीसाठी झाला होता.
(२) नाही.
या सर्व प्रकल्पामध्ये दि. २९/२/२०१६ रोजी ६०% पाणीसाठा शिल्लक होता.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी व लोखंडी बरग्यांसाठी अनुदान देण्याबाबत**

**(३९) ४६७८२ (२९-०४-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये राधानगरी व तुळशी असे मोठे प्रकल्प, कासारी, कुंभी व धामणी मध्यम प्रकल्प पाच लघु प्रकल्प असून त्यावर ४२ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत व सदर बधारे सुमारे ४० ते ५० वर्षापूर्वी बांधलेले असून त्यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे हे डोंगराळ भागात असलेले पावसाळ्यापूर्वी सर्व कामे करणे आवश्यक आहेत. दुरुस्तीअभावी अन्यथा को. प. बंधाऱ्यात पाणीसाठी कमी झाल्यास सिंचन तसेच बिगर सिंचन पाणी वापरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे दुरुस्तीकरण आवश्यक निधी उपलब्ध होणेकरीता कोल्हापूर विभागाकडून वरीष्ठ स्तरावर रु. ३५५.०० लक्ष किंमतीचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे दुरुस्ती व लोखंडी बरग्यांसाठी अनुदान उपलब्ध होणेकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा. जलसंपदा मंत्री यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, बंधारे दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्ह्यात ४ मोठे, १२ मध्यम व ६१ लघु पाटबंधारे प्रकल्प असून त्याअंतर्गत ३३२ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे (पूर्ण व बांधकामाधीन) आहेत. सदरचे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे सुमारे ४० ते ५० वर्षापूर्वी बांधण्यात आलेले असून सततच्या वापरामुळे काही प्रमाणात नादुरुस्त झाले आहेत.

(२) नाही.

सदर बंधाऱ्याची वार्षिक देखभाल दुरुस्ती करुन सिंचन व बिगर सिंचन यासाठी आवश्यक तितका पाणीसाठा व पाणी पातळी राखण्यात येते.

(३) नाही.

(४) व (५) होय, असे दि.१६.०२.२०१६ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

विशेष दुरुस्ती अंतर्गत कुंभी प्रकल्पांतर्गत ५ कोल्हापूर बंधाऱ्यांची काम प्रगतीत आहेत. उर्वरित बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यासाठी अंदाजपत्रके तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

---

## जिल्हा परिषद अकोला अंतर्गत असलेल्या लघुसिंचन विभागातील कार्यरत १८ शाखेतील अभियंत्यांच्या निलंबनाच्या प्रस्तावाबाबत

**(४०) ४६९५१ (३०-०४-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत असलेल्या लघुसिंचन विभागातील कार्यरत १८ शाखा अभियंत्यांचा निलंबनाचा प्रस्ताव जिल्हा परिषद प्रशासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लघुसिंचन विभागातील कार्यरत अभियत्यांच्या तांत्रिक कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करीत दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३ रोजी विभागाच्या तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी स्थायी समिती समोर माहिती दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा डाव्या कालव्यासह सिंचनाच्या अनेक योजना प्रलंबित असल्याबाबत

**(४१) ४७८२४ (१३-०५-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील भातसा धरणाच्या उजव्या कालव्याची देखभाल व दुरुस्तीअभावी दुरवस्था होऊन अनेक ठिकाणी कालव्याची पडझड झालेली असतानासुध्दा जलसंपदा विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे कालव्यात प्रचंड गाळ साचून गवत वाढत असून शेतीकरिता सिंचनाच्या अडचणी निर्माण होत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय आहे,

(२) तसेच भातसा डाव्या कालव्यासह धरणाचे काम होऊनही सिंचनाच्या योजना अनेक वर्ष प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून सदर कालव्याची वेळीच दुरुस्ती न केल्यास शेतकऱ्यांना पिण्याच्या व शेतीच्या पाण्यापासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा विभागाचे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(५) असल्यास, तद्नुसार शहापूर तालुक्यातील भातसा डाव्या कालव्यासह अनेक प्रलंबित असलेल्या सिंचन योजनांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

भातसा मोठा प्रकल्पाच्या उजव्या तीर कालव्याचे बांधकाम व अस्तरीकरण सुमारे ३०-३५ वर्षे जुनी असून हा कालवा अतिपर्जन्याच्या प्रदेशातील आहे. मागील ७ ते ८ वर्षापासून विविध प्रकारची बांधकामे तसेच अस्तरीकरण क्षतिग्रस्त होत असल्यामुळे कालव्याच्या काही भागात गाळ साचून गवत वाढत असल्याचे निदर्शनास आले होते, त्या अनुषंगाने उपलब्ध साधन सामग्री व उपलब्ध कर्मचारी वर्गाचा वापर करून सिंचन हंगाम सन २०१५-१६ साठी शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणे सर्वांना पाणी देऊन सिंचन हंगाम सुरळीत पार पाडण्यात आला आहे.

(२) नाही.

भातसा मोठया धरणाचे काम १००% पूर्ण झाले आहे. भातसा डाव्या तीर कालव्याची लांबी ५० कि.मी. असुन सुरूवातीच्या कि.मी. २ पर्यंतचे कालव्याचे काम सलगतेने पूर्ण झालेले आहे. तसेच कि.मी ३ ते ८ पर्यंतचे कालव्याची कामे वनजमिन वगळता अंशत: पूर्ण झालेली आहेत. कि.मी. ८ च्या पुढील काम वनजमिन संपादना अभावी सुरू करता आलेली नाही. डाव्या कालव्याच्या २ कि.मी क्षतिग्रस्त भागाची दुरूस्ती सन २०१६-१७ मध्ये विस्तार सुधारणा विशेष दुरूस्ती अंतर्गत करणे प्रस्तावित आहे. उर्वरित कालव्याचे काम वनजमीन प्रस्तावास केंद्र शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर हाती घेता येईल.

(३) अशी बाब नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) भातसा उजवा तीर व डावा तीर कालव्यासाठी अनुक्रमे १०६.६५ हे. व १६२.८०४ हे. असे एकूण २६९.४५४ हे वनजमिनीची आवश्यकता आहे. सदरचा वनजमीन हस्तांतरणाबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाचे पत्र दि. ८/१०/२०१५ अन्वये केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयास सादर करण्यात आला आहे. वनजमीन प्रस्तावास केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कालवा व वितरकांची कामे सलगतेने पूर्ण करून पूर्णपणे सिंचन क्षमता निर्मिती करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भामा आसखेड प्रकल्पातील प्रस्तावित डावा कालवा रद्द करण्याबाबत

**(४२) ४८२४२ (१६-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड प्रकल्पातील (जि.पुणे) प्रस्तावित डावा कालवा रद्द न केल्याने भामा आसखेड लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर “पुनर्वसनसाठी राखीव” असा शेरा असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांचे समवेत दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत कार्यकारी अभियंता भामा आसखेड धरण, पुणे यांना दुरुस्त प्रस्ताव सादर करणेबाबत आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालवा रद्द करून शिक्के काढणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कालवा रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०६-१०-२०१६) :** (१) होय, खरे आहे.

भामा आसखेड प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार धरणास डावा व उजवा कालवा प्रस्तावित आहे. पुनर्वसन कायदा अंतर्गत कलम १३(२) अन्वये डाव्या कालव्याखाली १२५५ हे. लाभक्षेत्र घोषित झाले आहे. पुनर्वसन कायद्यातील तरतूदीनुसार सदर लाभक्षेत्रावर पुनर्वसनासाठी राखीव असा शेरा देण्यात आला आहे.

(२) होय.

दुरुस्त प्रस्ताव कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग, पुणे यांचे पत्र दि.२.१२.२०१५ अन्वये जिल्हाधिकारी पुणे यांना पाठविण्यात आला आहे.

(३) होय.

(४) भामा आसखेड प्रकल्पाचे मंजूर १८८.६११ द.ल.घ.मी. पाणी वापरापैकी १४१.४८६ द.ल.घ.मी. पाणी पिण्याच्या पाणी वापरासाठी शासनाकडून आरक्षित झाल्याने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात कपात होत आहे. त्यामुळे प्रकल्प अंतर्गत डावा व उजवा कालवा रद्द करणेचा प्रस्ताव संबंधित महामंडळाकडून शासनास दि.७.४.२०१६ अन्वये सादर करणेत आला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्हातील सिंचन प्रकल्पाचे संकल्पन (डिझाईन) उपलब्ध करुन देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(४३) ४९०४७ (०५-०५-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील धरणे ही खोल मातीच्या भागात असल्याने धरणांच्या भागाचे डिझाईन सीडीओ अधिकाऱ्याकडून देण्यास विलंब होत असल्याची बाब विधानसभा सदस्य, अमरावती यांनी मा.जलसंपदा मंत्री तथा महासंचालक, मेरी, नाशिक यांना दिनांक ०२ नोव्हेंबर,२०१५ रोजी पत्रान्वये निदर्शनास आणून दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) होय.

विधान सभा सदस्य, अमरावती यांनी त्यांचे दिनांक निरंक चे मा.मंत्री, जलसंपदा तथा महासंचालक, मेरी, नाशिक यांना दिलेले आहे.

(२) शासन पत्र दिनांक ११/१२/२०१५ अन्वये महासंचालक, मेरी नाशिक यांना याविषयी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्यात व त्यानुसार खोल मातीच्या भागातील धरणाच्या भागांची आवश्यक संकल्पने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने उपलबध करुन दिली आहेत.

तसेच निम्नपेढी प्रकल्पाच्या डाव्या सिंचन विमोचकाचे संकल्पास शासनाने दिनांक ८/६/२०१६ चे पत्रान्वये धोरणात्मक मान्यता दिलेली आहे.

(३) कार्यवाही झालेली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी व प्रवरा कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेतीचे पाण्याअभावी नुकसान झाल्याबाबत**

**(४४) ४९७५५ (०३-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) व नाशिक जिल्हयातील दारणा तसेच अहमदनगर जिल्हयांमधील भंडारदरा ही धरणे यंदा जवळपास भरलेली असतांना गोदावरी व प्रवरा कालव्यांच्या लाभक्षेत्रातील शेती पाण्या अभावी उद्वस्त झाली असल्याचे माहे जानवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील माळवाड गावात शेतीला पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(४५) ४९८०३ (२८-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील माळवाड गाव येथील देवेंद्र रमेश डाखे (वय २८) या तरुणाने कर्जबाजारीपणामुळे त्यात पाण्याची पातळी खालावली असून निळवंडे व भंडारदरा धरणातून जायकवाडीसाठी पाणी सोडल्याने शेतीला पुरेसे पाणी मिळत नसल्याने नैराश्येपोटी आत्महत्या केली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्यासाठी जिल्हयातील आत्महत्या करण्याची दुसरी घटना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतीला पोषक पाणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) नाही.

भंडारदरा व निळवंडे धरणातून भंडारदरा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात खरीप हंगामात दि.१३/०८/२०१५ ते दि.१३/०९/२०१५ व रब्बी हंगामात दि.२४/११/२०१५ ते दि.२९/१२/२०१५ या कालावधीत सिंचन व बिगर सिंचनासाठी आवर्तने देण्यात आलेली आहेत. या दोन्ही आवर्तनात श्री.देवेंद्र रमेश डाखे यांनी सिंचनासाठी पाणी मागणी केलेली नाही. त्यामुळे निळवंडे व भंडारदरा धरणातून जायकवाडीसाठी पाणी सोडल्याने शेतीला पुरेसे पाणी मिळत नसल्याने नैराश्येपोटी श्री.डाखे यांनी आत्महत्या केली असे म्हणणे वस्तुस्थितीस अनुसरुन नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापुर) तालुक्यातील कळम्मावाडी धरणस्थळाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम पुरेशा निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४६) ५०७६३ (२९-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी तालुक्यातील (जि.कोल्हापुर) कळम्मावाडी धरणस्थळाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम पुरेशा निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार निधी अभावी प्रलंबित सदर रस्त्याचे काम तातडीने व्हावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) ते (३) हे खरे नाही. प्रश्नाधीन रस्ता हा रा.मा.१७८ पासून मांजरखिंड, फराळे, भांडणे, राज्यमार्ग १७८ ला मिळणारा इतर जिल्हा मार्ग क्र.६४ असून सदर रस्त्याची एकूण लांबी ३५.०० कि.मी आहे. यापैकी धरणस्थळापर्यंत जाणारी लांबी ७.३०० कि.मी. इतकी असून उर्वरित लांबी धरणक्षेत्रामध्ये बुडीत आहे. या लांबीपैकी ०/०० ते ०/९०० कि.मी. मध्ये डांबरी पृष्ठभाग असून सुस्थितीत आहे. ०/९०० ते ६/९०० कि.मी. लांबीमध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर असलेले मजबुतीकरणासह डांबरीकरणाचे काम मार्च २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

उर्वरित ६/९०० ते ७/३०० कि.मी. या लांबीतील खराब रस्त्याच्या दुरूस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोअर पुस प्रकल्प वेणी (ता.महागांव, जि.यवतमाळ) प्रकल्पाचे क्षमतेएवढे ओलीत होण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(४७) ५१८२८ (३०-०४-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोअर पुस प्रकल्पाला तीस वर्ष झाल्यानंतरही प्रकल्प पुर्ण भरुनसुध्दा ओलीताचे दहा हजार हेक्टरचे लक्ष्य आजपर्यंत एकही वर्षे गाठता आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प ० ते ५० कि.मी. व त्यापुढे ० ते १२ कि.मी. चा केला असे असता फक्त ४० कि.मी. पर्यंत ओलीतासाठी पाणी देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाचे क्षमते ऐवढे ओलीत होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१६) :** (१) होय.

लोअरपुस प्रकल्पाची प्रकल्पाची प्रकल्पिय सिंचन क्षमता ९११० हे. (खरीप २५५१ हे., रब्बी व दुहंगामी ५१९३ हे., उन्हांळी ५४६ हे व बारमाही ८२० हे) आहे. आतापर्यंत सन २०१२-१३ मध्ये जास्तीत जास्त सिंचित क्षेत्र ५५२६ हे. इतके झालेले आहे. या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात खरीप हंगामात हमखास पाऊस पडतो. त्यामुळे प्रत्यक्ष पिके उभी असतांनाही त्यांना कालव्यातून पाणी घेतले जात नाही. त्यामुळे प्रत्यक्षात सिंचित क्षेत्र कमी दिसते.
(२) हे खरे नाही.

प्रकल्पास ५० कि.मी. लांब मुख्य कालवा व त्यामुळे १२.५० कि.मी. लांब पुच्छ वितरीका आहे. त्यापैकी मुख्य कालव्याच्या संपूर्ण ५० कि.मी. लांबीत ओळीतासाठी पाणी दिले जाते. तसेच पुच्छ वितरीकेच्या ६ कि.मी. पर्यत ओलीतासाठी पाणी दिले जाते.
(३) देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध होणाऱ्या नियत अनुदानातुन आवश्यकतेनुसार दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लघु पाटबंधारे विभागात दिघी तलाव क्र.२ (ता.पाचोरा, जि.जळगाव) मध्ये विहिरीचे क्षेत्र भूसंपादित करण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(४८) ५३२१६ (०६-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघु पाटबंधारे विभागात दिघी तलाव क्र.२ (ता.पाचोरा जि.जळगाव) मध्ये सुमारे तीस वर्षापासून विहिरीचे क्षेत्र भूसंपादित करण्यास विलंब होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच यासंदभात तेथील ग्रामपंचायत व ग्रामस्थाकडून जिल्हाधिकारी, प्रांतधिकारी, तहसीलदार, पंचायत समिती, गटविकास अधिकारी, लघु पाटबंधारे यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही कोणतीच कार्यवाही करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-१०-२०१६) :** (१) होय.
(२) नाही. ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी टंचाई काळात विहिर अधिग्रहीत करणेबाबत जिल्हाधिकारी प्रांताधिकारी तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांचेकडे मागणी केली आहे. त्याप्रमाणे टंचाई काळात विहिर अधिग्रहणाची कार्यवाही तहसिलदार यांचेकडे मागणी केली आहे. त्याप्रमाणे टंचाई काळात विहिर अधिग्रहणाची कार्यवाही तहसिलदार यांचेमार्फत करण्यात आली आहे.
(३) व (४) क्षेत्रीय अधिकाऱ्यांद्वारे पाहणी करण्यात येऊन श्री.जयसिंग भाऊसिंग राजपूत रा.दिघी यांच्या गट नं. ९८ मधील विहीर व आवश्यक जमिन संपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे का.अ. लपावि, जळगांव यांचे पत्र क्र.लपावि/प्रशा-/भूसंपादन/१०६८/२०१६ दिनांक ९/३/२०१६ अन्वये प्रस्तावित केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील उर्वरीत सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत**

**(४९) ५९०४५ (११-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिंचनावर ७० हजार कोटी रुपये खर्च दाखवून प्रत्यक्षात ४५ हजार कोटीपर्यंतही खर्च केलेला नाही व अजून ३७६ प्रकल्प शिल्लक असल्याचेही माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिल्लक प्रकल्पाकरिता आणखी ८५ हजार कोटींची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता किती निधीची तरतुद करण्यात येणार आहे व त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-१०-२०१६) :** (१) व (२) राज्यात सिंचनावर रु. ७० हजार कोटी रुपये खर्च दाखवून प्रत्यक्षात रु. ४५ हजार कोटी पर्यतही खर्च केला नाही अशी बाब निदर्शनास आलेली नाही. राज्यात ३७६ प्रकल्प सुरु असून प्रकल्प कामाची दिनांक १.४.२०१६ ची संभाव्य उर्वरित किंमत रु. ८४५०० कोटी इतकी आहे.

(३) सन २०१६-१७ मध्ये प्रकल्पासाठी रु. ६९१० कोटीची तरतुद करण्यात आली आहे. इतर स्त्रोतातून जास्तीचा निधी उपलब्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणसाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(५०) ६३३८५ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासाठी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये दुरुस्ती करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. वित्त व नियोजन मंत्री महोदयांनी मा. केंद्रीय गृह मंत्री महोदयांना केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून सदरहू पत्राच्या अनुषंगाने आजतागायत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(३) असल्यास, कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २४२ (40)

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०९-२०१६) :** (१) होय.
(२), (३) व (४) कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१ (२) मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असून सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.